**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करणारी धोरणं सरकार राबवत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ३ टक्क्यांनी वाढून ५३ टक्के, जुलैपासूनची थकबाकी या महिन्याच्या वेतनात मिळणार
- दिल्ली विधानसभेत नायब राज्यपालांच्या अभिभाषणावेळी घोषणाबाजी केल्यामुळं आपचे २१ आमदार निलंबित
- छत्तीसगडमध्ये विजापूर जिल्ह्यात नऊ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण

**आणि**

- रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी उद्यापासून विदर्भ आणि केरळ यांच्यात लढत

**<><><><><>**

बदलत्या भूराजकीय आणि आर्थिक परिस्थितीत साऱ्या जगाचं लक्ष भारतावर केंद्रीत झालं आहे. विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करणारी धोरणं सरकार राबवत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ॲडवांटेज आसाम या गुंतवणूकदार संमेलनाच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन केल्यानंतर  आज गुवाहाटी इथं ते बोलत होते....

कारखाना क्षेत्राची वाढ आणि रोजगारनिर्मिती याकरता आवश्यक पायाभूत सोयी सुविधा आणि उद्योगांना अनुकूल वातावरण देण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.  केंद्र आणि राज्य सरकारने केलेल्या शांतता

करारामुळेच आसामची परिस्थिती गेल्या काही वर्षात सुधारल्याचं चित्र दिसत असल्याचंही मोदी यावेळी म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आसामच्या विकासासाठी काम करत असून आसाम हे भारताचं विकास इंजिन असेल, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या परिषदेत केलं. गुवाहाटी इथे एक अत्याधुनिक आयटी केंद्र बनवण्याची घोषणाही त्यांनी केली.

राज्यात विविध क्षेत्रात मोठी गुंतवणूक करण्याच्या घोषणा यावेळी विविध उद्योजकांनी केल्या.

<><><><><>

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ झाली. आता राज्य सरकारी सेवेतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ५३ टक्के महागाई भत्ता मिळेल. १ जुलैपासून ही दरवाढ लागू होणार आहे आणि जुलै ते जानेवारी दरम्यानची थकबाकी या महिन्यातल्या वेतनासह दिली जाणार आहे.

<><><><><>

नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांच्या अभिभाषणाच्या वेळी घोषणाबाजी केल्यामुळे विरोधी पक्षनेत्या आतिशी यांच्यासह आम आदमी पार्टीच्या २१ आमदारांना विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता यांनी अधिवेशनाच्या तीन बैठकींसाठी निलंबित केलं आहे. गोपाल राय, वीर सिंग धिंगन, मुकेश अहलावत, चौधरी झुबैर अहमद, अनिल झा, विशेष रवी आणि जरनैल सिंग यांचा निलंबन झालेल्या आमदारांमधे समावेश आहे. त्यानंतर निलंबित

आमदारांनी विधानभवनाच्या परिसरात निदर्शनं केली. दरम्यान, विधानसभेचं अधिवेशन दोन दिवस वाढवण्यात आलं आहे.

**<><><><><>**

१९८४मधे दिल्लीत झालेल्या शीखविरोधी दंगलीप्रकरणी काँग्रेस नेता सज्जनकुमार याला दिल्ली न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. जसवंतसिंग आणि त्यांचा मुलगा तरुणदीप सिंग याच्या हत्येच्या आरोपाखाली विशेष न्यायाधीश कावेरी बावेजा यांनी सज्जनकुमारला दोषी ठरवलं असून जन्मठेप सुनावली आहे. या दंगलींसंदर्भात सज्जनकुमारला अन्य हत्याप्रकरणी अगोदरच जन्मठेप मिळाली असून त्यानं सुटकेसाठी दाखल केलेल्या अपिलांची सुनावणी वेगवेगळ्या वरच्या न्यायालयांमधे सुरु आहे.

**<><><><><>**

बिटकॉईन क्रिप्टोकरन्सी घोटाळ्याप्रकरणी सीबीआय देशभरातल्या ६०हून अधिक ठिकाणी व्यापक छापे टाकले आहेत. पुणे, कोल्हापूर, नांदेड, दिल्ली, चंदिगड, बेंगळुरू अशा शहरांमध्ये हे छापे टाकले गेले आहेत. गेन बिटकॉईन नावाने ही कंपनी २०१५ मध्ये सुरू झाली होती. या कंपनीने १८ महिन्यांसाठी दरमहा १० टक्के दराने फायदेशीर परतावा देण्याचं आश्वासन दिलं होतं. २०१७मध्ये या कंपनीचा घोटाळा उघड झाला होता. त्यानंतर या कंपनीविरोधात देशभरात तक्रारी दाखल झाल्या होत्या.

**<><><><><>**

पंजाबमधे बेकायदेशीर ट्रॅव्हल एजंट्सच्या विरोधात आज दिवसभर राज्यस्तरीय मोहीम राबवण्यात आली. यात १ हजार २७४ कंपन्यांवर छापे टाकण्यात आले. तर ७ ट्रॅव्हल एजंट्सना अटक करण्यात आली. बेकायदेशीर ट्रॅव्हल एजंटांच्या विरोधात २४ एफआयआर नोंदवले आहेत. सर्व जिल्हा पोलीस प्रमुखांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात अशा संस्था आणि एजंटांचा तपास करण्यासाठी विशेष पोलीस पथकं स्थापन करावीत अशा सूचना त्यांना दिल्या असल्याचं पंजाबचे विशेष पोलीस महासंचालक अर्पित शुक्ला यांनी सांगितलं.

**<><><><><>**

छत्तीसगडमध्ये विजापूर जिल्ह्यात आज नऊ नक्षलवाद्यांनी सीआरपीएफ आणि पोलिसांसमोर आत्मसमर्पण केलं आहे. त्यापैकी चार जणांवर २३ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. आत्मसमर्पण केल्यानंतर, छत्तीसगड राज्य सरकारच्या आत्मसमर्पण आणि पुनर्वसन धोरणांतर्गत या प्रत्येक नक्षलवाद्याला प्रोत्साहन म्हणून २५ हजार रुपये देण्यात आले.

**<><><><><>**

भारत-म्यानमार सीमेवरच्या परिस्थितीचा सर्वंकष आढावा घेण्यासाठी लष्करी मोहिमा विभागाचे महासंचालक लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी मणीपुरचा दौरा केला. आज संपलेल्या या दोन दिवसांच्या दौऱ्यात भारतीय लष्कराची सज्जता आणि मणीपूरमधल्या सध्याच्या सुरक्षास्थितीवर त्यांनी भर दिला. मणिपूरचे राज्यपाल, सुरक्षा सल्लागार, मुख्य सचिव आणि पोलीस महासंचालकांची त्यांनी भेट घेतली. राज्यात सध्या निर्माण झालेली

स्थिती सुरळीत करणं, विशेषत: सीमा व्यवस्थापन वाढवणं आणि भारत-म्यानमार सीमेवर सुरक्षा विषयक पायाभूत सुविधा बळकट करणं यावर त्यांनी चर्चा केली.

**<><><><><>**

तेलंगणात श्रीशैलम लेफ्ट बँक कालव्यासाठीच्या बोगद्यात अडकलेल्या आठ कर्मचाऱ्यांना वाचवण्याचं काम आज चौथ्या दिवशीही सुरू आहे. या कर्मचाऱ्यांमध्ये २ अभियंते आणि ६ कामगारांचा समावेश आहे. भारतीय सैन्य दलाचं पथक, एनडीआरएफ, एसडीआरएफच्या पथकाकडून हे बचावकार्य सुरू असून पाणी आणि गाळामुळे त्यात अडथळे येत असल्याची माहिती तेलंगणाचे पाटबंधारे मंत्री उत्तम कुमार रेड्डी यांनी दिली आहे.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं संगमावर सुरु असलेल्या महाकुंभ पर्वाचा उद्या महाशिवरात्रीच्या दिवशी समारोप होणार आहे. अमृतस्नान करण्याचा उद्या शेवटचा दिवस असल्यानं गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनानं वाहतुकीचं नियमन केलं आहे. प्रयागराजमधल्या महाकुंभमेळ्यात आतापर्यंत ६३ कोटींहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केलं आहे.

**<><><><><>**

महिला प्रिमियर क्रिकेट लीगमध्ये आज बंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर गुजरात जायंटस आणि दिल्ली कॅपिटल्स यांचा सामना होत आहे. दिल्ली कॅपिटल्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात जायंटसच्या ८ षटकात ४ बाद ४१ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना, उद्या विदर्भ आणि केरळ यांच्यात होणार आहे. नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडिममधे उद्या सकाळी साडेनऊ वाजता हा सामना सुरु होईल.
या स्पर्धेत विदर्भानं सातपैकी ६ सामने जिंकून ४० गुणांची कमाई केली. तर केरळनं सातपैकी ३ सामने जिंकून २८ गुण कमावले आहेत.

<><><><><>

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज पाकिस्तानमध्ये रावळपिंडी मैदानावर आयोजित दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया संघांदरम्यान होणारा सामना पावसामुळे रद्द झाला. दोन्ही संघांना याचा प्रत्येकी एक गुण मिळणार आहे.

<><><><><>

राज्यसभा सचिवालयाची संशोधन इंटर्नशिप यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल अहिल्यानगर जिल्ह्यातल्या निघोज इथल्या गणेश ढवण यांना उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आलं. देशभरातून ३५ युवकांची या इंटर्नशिपसाठी निवड झाली होती, त्यामध्ये गणेश ढवण हे महाराष्ट्राचं प्रतिनिधीत्व करत आहेत. संसदीय कार्यपद्धती आणि धोरणात्मक बाबींच्या सखोल अध्ययनासाठी हा उपक्रम राबवला जातो.

<><><><><>

भारतीय तटरक्षक दल हे जगातल्या सर्वात कार्यक्षम सागरी दलांपैकी एक असल्याचे प्रशंसोद्गार संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आज काढले. नवी दिल्ली येथे आज झालेल्या एका समारंभात ते बोलत होते. या समारंभात सिंह यांनी भारतीय तटरक्षक दलाच्या कर्मचाऱ्यांना शौर्य, विशिष्ट सेवा आणि गुणवंत सेवा पदकं प्रदान केली. केंद्र सरकार भारतीय तटरक्षक दलाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी वचनबद्ध असून त्यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात ९ हजार ६७६ कोटी रुपयांची तरतूद केली आहे, असंही सिंह यावेळी म्हणाले.

**//<><><><><>//**